# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई-४००००१.
PH:2264 1150,2 264 1151, 22620601, 22690602, FAX:2692102
Telegram : Edutech E-Mail : director@dte.org.in
Website: http://www.dte.org.in


क्रमांक: १८/अ.स.विभाग/२०११/२२६
दिनांक १/१०/२०११.

प्रति,

प्राचार्य,
शासकीय, अनुदानित, विनाअनुदानित
अभियांत्रिकी महाविद्यालये, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये,
एमबीए महाविद्यालये, एमसीए महाविद्यालये,
वास्तुशास्त्र महाविद्यालये इ.

विषय:- केंद्रशासनाच्या मेरिट-कम-मिन्स शिष्यवृत्तीबाबत.

मेरिट-कम-मिन्स शिष्यवृत्तीचे नवीन अर्ज भरण्याची तारीख ३०/९/२०११ आहे. विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यामध्ये अडचणी येत आहेत. तसेच सदरचा अर्ज एडीट करण्यामध्ये संस्थेला अडचणी येत आहेत. याबाबत दिनांक २२/९/२०११ रोजी अल्पसंख्यांक महाविद्यालय, नवी दिल्ली यांनी दिनांक २२/९/२०११ रोजी बैठक घेतली होती. यामध्ये त्यांना खालील सूचना दिलेल्या आहेत.

- संस्थेमधील ज्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे अशा विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन http://www.momascholarship.gov.in या वेबसाईटवर भरुन घ्यावे व सदरचे अर्ज संस्थेकडे पाठविण्यास करण्यास सांगावे.
- सदर अर्जामध्ये विद्यार्थ्याला काही बदल करावयाचा असल्यास व विद्यार्थी ते बदल ऑनलाईन मध्ये करु शकत नसेल तर भरलेल्या अर्जाची प्रिंट काढावी व त्या प्रिंटवर शाईने दुरुस्ती करावी व सदरचा अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह संस्थेमध्ये सादर करुन घ्यावा.
- सदर ऑनलाईन अर्जामध्ये बदल करण्याचे काही अधिकार संस्थेला दिले आहेत. शक्य ते बदल व दुरुस्ती करुन संस्थेने सदरचा अर्ज संबंधित तंत्र शिक्षण, सहसंचालक यांचेकडे पाठवावा. तसेच शाईने दुरुस्ती केलेली हार्डकॉपी देखील संबंधित सहसंचालक यांचेकडे दिनांक २०/१०/२०११ पूर्वी पाठवावी.
- विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज संस्थेच्या ऑफीस व प्रिन्सीपल अकौंटमध्ये जमा होतात. या अर्जांची छाननी करुन ते अर्ज संबंधित सहसंचालक यांचेकडे ऑनलाईन पध्दतीने पाठविणे गरजेचे आहे.

- कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांनी भरलेला ऑनलाईन अर्ज आवश्यकती कार्यवाही करुन ऑनलाईन तसेच ऑफलाईन हार्डकॉपी संबंधित सहसंचालक तंत्र शिक्षण यांचेकडे पोहोचेल याबाबत सर्व प्राचार्यानी दक्षता घ्यावी.
- आपल्या संस्थेमध्ये प्रवेश घेतलेल्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्याची यादी या संचालनालयाकडे आहे. ज्या संस्था पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज सहसंचालकांकडे पाठविणार नाहीत अशा संस्थांवर कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

( डॉ. सुभाष का. महाजन )
प्र.संचालक तंत्र शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,
सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, अमरावती, औरंगाबाद यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

desk 18.doc